# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०९/०७/२०२५

## पुरग्रस्त ठिकाणी आणि संपर्क तुटलेल्या गावाला मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांची भेट, वैदयकीय उपचाराची अत्यंत आवश्यकता असलेल्या २ बालकांना मदत

नागपूर जिल्ह्यात सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. काल रात्री गोसीखुर्द धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आल्यानंतर, उमरेड विभागात आज मोठ्या प्रमाणात पूर आला, ज्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. उमरेड विभागातील तीन गावांमध्ये पाणी वाढतच राहिल्याने टेकेपार, आवरमारा आणि चिंचघाट येथे गंभीर पुरपरिस्थिती निर्माण झाली. सदर परीस्थीतींचा आढावा घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर ठिकाणी भेट दिली. सर्व प्रथम आम नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने तेथील परिस्थीती बाबत पाहणी करून त्यानंतर संपर्क तुटलेले गाव टेकेपार येथे मा. पोलीस अधिक्षक हे स्वतः एन.डी.आर.एफ. (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल) पथका सोबत त्यांच्या बोटीने गेले. त्यावेळी मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या सह, श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमेरड, श्री अमित घाटगे, तहसीलदार, कुही हे सुध्दा एन.डी.आर.एफ च्या बोटी मध्ये टेकेपार येथे गेले. टेकेपार येथे जावुन मा. पोलीस अधिक्षक यांनी तेथील नागराकांशी सवांद साधुन त्यांच्या अडी–अडचणी जाणुन घेतल्या. गावातील दोन लहान मुलांना ताप आलेला होता. त्यांना वैदयकीय उपचारांची अत्यंत आवश्यकता होती. नमुद पथकाने टेकेपार गावातील श्री अविनाश गायकवाड, त्यांची पत्नी सौ भारती गायकवाड यांना त्यांच्या ८ महिन्यांच्या आजारी बाळासह आणि ६ वर्षाच्या मुलासह एन.डी.आर.एफ च्या बोटीने गावाच्या बाहेर काढले. वेलतूर पोलिसांनी नमुद कुटुंबाला उपचारासाठी रुग्णालयात पाठवल्याने त्यांना वेळीच मदत मिळाली. तसेच सदरवेळी मा पोलीस

अधिक्षक यांनी सदर गावातील लोकांना हालविण्यासाठी सुरक्षीत ठिकाणाची पाहणी केली. नमुद एन.डी.आर.एफ. पथकाचे नेतृत्व श्री कृपाल मुळे यांनी केले.








